## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

माझी माय माऊली आई वाग्जाई
शरण राहो नित्य तुला बाबा मंदिरी माझ्या गणू मंदिरी ॥धृ॥

गणू घेतो तूझे रुप छान ,त्याने दावियले उक्शी तुझे स्थान
पटता दर्शनाची घाई ॥1॥ आई वाग्जाई

गणूबाबांनी दिले तुझे नाम, दिले श्री सुक्ताचे धडे महान
घरोघरी पूजन,तुझे नामस्मरण
मायलेकराचे नाते दिले जोडूनी ॥2॥ आई वाग्जाई

सा-या त्रिभूवनाची आहेस तू शक्ती
ठाऊक नव्हती आम्हा तुझी महती
नाम घेता मुखी,भासे अवती-भवती
बाबा रुपात तुझे दर्शन मंदिरी ॥3॥ आई वाग्जाई

माते आहे तुजपाशी आळवणी
सदा चित्त राहो शिवशक्ती चरणी
देहबुध्दी जावो ह्रदयी चिंतन राहो
नाम राहो मुखी अखेरच्या क्षणी ॥4॥ आई वाग्जाई

★★★★★